## समान संधी निर्माण करण्यासाठीचे कृती धोरण

टाटा पॉवर सामाजिक समता आणि विशेषतः अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, दिव्यांग व्यक्ती आणि वंचित समाजातील महिला (AA गट) अशा सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित घटकांना सक्षम करता येईल अशा संधी मिळवून देण्यावर विश्वास ठेवते. कामाच्या ठिकाणी विविधता असणे हे कंपनीच्या व्यवसायावर, भागीदारीवर आणि भविष्यात तयार राहण्यावर सकारात्मक परिणाम घडवते याची कंपनीला जाणीव आहे. टाटा पॉवर आपले प्रशिक्षण स्त्रोत जास्तीत जास्त प्रमाणात स्वयंप्रेरणेने वापरून AA गटातील समाजाच्या शिक्षण, रोजगारक्षमता, आर्थिक व डिजिटल समावेशकता सुधारण्यासाठी प्रयत्नशील राहील. टाटा पॉवर AA गटांना उद्योजकतेसाठी सक्षम व प्रोत्साहित करेल आणि औद्योगिक मूल्यसाखळीत त्यांचा समावेश सुनिश्चित करेल.

## समान संधी निर्माण करण्यासाठीच्या कृती धोरणातील प्रमुख तत्त्वे

- टाटा पॉवरचा यावर विश्वास आहे की कंपनीची कार्यक्षमता ही समाजातील सर्व घटकांच्या कल्याणाशी जोडलेली आहे.
- विविधता आणि सामाजिक समावेशकता हे कंपनीच्या वाढीस आणि स्पर्धात्मकतेस, कार्यक्षमतेस प्रोत्साहन देतात अशी टाटा पॉवरची धारणा आहे.
- टाटा पॉवरला हे मान्य आहे की कामाच्या ठिकाणी सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांचे प्रतिनिधित्व करणे व्यवसायावर सकारात्मक परिणाम घडवते.
- टाटा पॉवर AA समुदायांच्या कौशल्य विकासासाठी आवश्यक प्रशिक्षण आणि क्षमता निर्मिती करून त्यांच्या कौशल्याच्या पातळ्या उंचावण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल.
- टाटा पॉवर संबंधित संस्थांसोबत भागीदारी करून AA समुदायांना पाठबळ देईल.
- टाटा पॉवर समाजाच्या वंचित घटकांतील सदस्यांना उपजीविका आणि रोजगाराच्या समान संधी देण्यासाठी प्रोत्साहन देईल.
- टाटा पॉवर आपले व्यवसाय भागीदार निवडताना नियमित व्यवसाय निकषांवर आधारित निवड करेल. सर्व निकष समान असतील अशा परिस्थितीत, कंपनी AA गटांतील व्यवसाय भागीदारांना प्राधान्य देईल.

(प्रवीर सिन्हा)
मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक

दिनांक: १४ जानेवारी २०२५